# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

**वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय**

**महात्मा ज्योतीबा फुले शैक्षणिक परिसर, अमरावती रोड, नागपूर. फोन व फॅक्स नं. (०७१२) २५००५८१**


पत्र क्र. विलेअ/ दिनांक :- ०४ जुलै, २०१७

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालय व
स्वायत्त/मान्यताप्राप्त संस्था

२. विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभागप्रमुख

३. प्राचार्य,
विद्यापीठ संचालित महाविद्यालये

} राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

**विषय :— शिक्षक कल्याण निधी अंतर्गत बहाल करावयाच्या उत्कृष्ठ शिक्षक पुरस्कारासाठी आवेदन करण्याबाबत.**

महोदय,

विषयांकीत बाबीसंबधी आपणास सविनय कळविण्यात येते की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील शिक्षक कल्याण निधी नियमावली अंतर्गत येत्या शिक्षक दिनी दि. **५ सप्टेंबर, २०१७** रोजी विद्यापीठातील पुर्णकाळ मान्यताप्राप्त शिक्षकांना खालीलप्रमाणे पुरस्कार देण्याचे ठरविण्यात आले आहे.

| अ.क्र. | पुरस्काराची वर्गवारी | पुरस्काराची संख्या |
|---|---|---|
| १. | उत्कृष्ठ प्राचार्य (Best Principal) | ०१ |
| २. | उत्कृष्ठ शिक्षक (Best Teacher) | ०५ |
| ३. | उत्कृष्ठ शास्त्रज्ञ/संशोधक (Best Scientist/Researcher) | ०५ |
| ४. | उत्कृष्ठ लेखक (Best Writer) | ०५ |
| ५. | सामाजिक कार्यात सहभागी उत्कृष्ठ शिक्षक (Best Teacher involved in Social Activities) | ०५ |

शिक्षक कल्याण निधी समितीने उपरोक्त पुरस्कारासाठी खालीलप्रमाणे कार्यपद्धती विहित केली आहे.

१. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित/संचालित महाविद्यालये/स्वायत्त संस्था, मान्यताप्राप्त संस्था, विद्यापीठ शैक्षणिक विभाग येथील पुर्णकाळ मान्यताप्राप्त प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, उपग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल, संचालक, शारिरीक शिक्षण/शारिरीक शिक्षण निर्देशक या पदावर एकूण १० वर्षे मान्यताप्राप्त व पुर्णकाळ शैक्षणिक अनुभव असलेले शिक्षक सदर पुरस्कारासाठी अर्ज करण्यास्तव पात्र ठरतील.

२. विद्यापीठाद्वारे यापूर्वी ज्या शिक्षक/प्राचार्यांना आदर्श शिक्षक/प्राचार्य पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे असे शिक्षक/प्राचार्य अर्ज करण्यासाठी पात्र ठरणार नाही.

३. प्रस्तुत पुरस्कारासाठी विहित नमुण्यात आवेदन करणे आवश्यक राहील. प्रत्येक वर्गवारीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करावा लागेल.

४. सदर आवेदनपत्राचा नमुना विद्यापीठाची वेबसाईट www.nagpuruniversity.org वर उपलब्ध करण्यात आला असुन सदर नमुना डाऊनलोड करुन विहीत नमुण्यात अर्ज सादर करण्यात यावा. विहीत नमुण्याव्यतिरिक्त वेगळया स्वरूपात प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

५. विहीत आवेदनपत्राच्या संबंधीत रकाण्यात पूर्णपणे/स्पष्टपणे स्वहस्ते किंवा टाईप करून माहिती भरणे आवश्यक राहील. ज्या रकाण्यात कोणतीही माहिती भरावयाची नसल्यास त्या रकाण्यात NIL असे नमुद करावे. रकाण्यात भरलेल्या माहितीच्या पृष्ठयर्थ आवश्यक सहपत्रे/कागदपत्रे/ प्रमाणपत्रे आदीच्या प्रमाणित प्रती जोडणे आवश्यक राहील. आवेदन पत्रातील रकाण्यात परिपूर्ण माहिती भरण्यासाठी जागा कमी पडत असल्यास वेगळे फुल साईज कागद जोडून त्यात माहिती नमुद करावी. जोडलेल्या कागदावर आवेदनपत्रातील रकाण्याचा अनुक्रमांक नमुद करावा. प्रत्येक अर्जाच्या (सहपत्रासह) ७ प्रती पाठविणे आवश्यक राहील.

६. प्रत्येक प्राप्त अर्जाची छाननी व मुल्यमापन शिक्षक कल्याण निधी समितीद्वारे गठीत मुल्यमापन समितीद्वारे करण्यात येईल. सदर समिती ही शिक्षक कल्याण निधी समितीने विहित केलेले निकष, मार्गदर्शक तत्वे व कार्यपद्धतीनुसार प्राप्त अर्जांचे मुल्यमापन करेल व आपल्या शिफारशी मा. कुलगुरूंना सादर करेल. यासंबंधी मा. कुलगुरूंनी घेतलेला निर्णय हा अंतीम व बंधनकारक राहील.

७. अर्जदारांने एकापेक्षा जास्त वर्गवारीतील पुरस्कारासाठी आवेदन केले असल्यास सर्व अर्जाच्या मुल्यांकनाअंती अंतीमत: संबंधीत अर्जदाराची फक्त एका वर्गवारीतुन पुरस्कार बहाल करण्यासाठी निवड केली जाईल. यासंबंधी मुल्यमापन समितीने केलेल्या शिफारसी विचारात घेवुन मा. कुलगुरू अंतीम निर्णय घेतील.

८. प्राप्त अर्जाची संख्या विचारात घेता पुरस्कारांची संख्या कमी करण्याचा अधिकार शिक्षक कल्याण निधी समितीला राहील.

९. सदर पुरस्कारासाठी शिक्षक कल्याण निधी समितीने विहित केलेले निकष विचारात घेवुन त्या अनुषंगाने गुणांकन/वर्गवारी करण्यास्तव मार्गदर्शक तत्वे व कार्यपद्धती विहित करण्याचा अधिकार मुल्यमापन समितीला राहील.

१०. विहीत आवेदनपत्रे खालील पत्त्यावर प्रत्यक्षरित्या किंवा टपालाने पाठविण्यात यावी.

**प्रति,**
**वित्त व लेखा अधिकारी व**
**सदस्य सचिव,**
**शिक्षक कल्याण निधी समिती,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,**
**महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसर,**
**अमरावती रोड, नागपूर — ४४० ०३३.**

११. आवेदनपत्रे दि. ३१ जुलै, २०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपरोक्त पत्त्यावर प्राप्त होतील या बेताने पाठविण्यात यावी. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

१२. संबंधीत प्राचार्य/विभागप्रमुखांनी सदर पत्र त्यांच्या नियंत्रनाखालील कार्यरत सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणुन घ्यावे व त्यांची सुचनापत्रावर स्वाक्षरी घ्यावी.

आपला

**(डॉ. राजु हिवसे)**
वित्त व लेखा अधिकारी

**प्रतिलिपी माहितीस्तव :**

१) मा. प्र—कुलगुरू व अध्यक्ष, शिक्षक कल्याण निधी समिती.
२) शिक्षक कल्याण निधी समितीचे सर्व सदस्य.
३) कुलसचिव/संचालक,परिक्षा व मुल्यमापन मंडळ
४) उपकुलसचिव (लेखा)

} रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

पत्र क्र. लेखा/व्यय                                                                 दि. ०४/०७/२०१७

**शिक्षक कल्याण निधी अंतर्गत बहाल करावयाच्या उत्कृष्ठ शिक्षक पुरस्कारासाठी आवेदन करण्याबाबत सुचना.**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील शिक्षक कल्याण निधी नियमावली अंतर्गत विद्यापीठातील पुर्णकाळ मान्यताप्राप्त शिक्षकांना खालीलप्रमाणे पुरस्कार देण्याचे ठरविण्यात आले आहे.

| अ.क्र. | पुरस्काराची वर्गवारी | पुरस्काराची संख्या |
|---|---|---|
| १. | उत्कृष्ठ प्राचार्य (Best Principal) | ०१ |
| २. | उत्कृष्ठ शिक्षक (Best Teacher) | ०५ |
| ३. | उत्कृष्ठ शास्त्रज्ञ/संशोधक (Best Scientist/Researcher) | ०५ |
| ४. | उत्कृष्ठ लेखक (Best Writer) | ०५ |
| ५. | सामाजिक कार्यात सहभागी उत्कृष्ठ शिक्षक (Best Teacher involved in Social Activities) | ०५ |

सदर पुरस्कारासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाशी संलग्नित/संचालित महाविद्यालये/स्वायत्त संस्था, मान्यताप्राप्त संस्था, विद्यापीठ शैक्षणिक विभाग येथील पुर्णकाळ मान्यताप्राप्त प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, उपग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल, संचालक, शारिरीक शिक्षण/शारिरीक शिक्षण निर्देशक या पदावर एकूण १० वर्षे मान्यताप्राप्त व पुर्णकाळ शैक्षणिक अनुभव असलेले शिक्षक सदर पुरस्कारासाठी अर्ज करण्यास्तव पात्र ठरतील.

सदर पुरस्कारांसाठी विहित केलेली कार्यपद्धती, इतर अटी व निकष तसेच आवेदन पत्राचा नमुना विद्यापीठाची वेबसाईट www.nagpuruniversity.org वर उपलब्ध करण्यात आला असुन सदर नमुना डाऊनलोड करुन विहीत नमुण्यात स्वहस्ते किंवा टाईप करून अर्ज सादर करण्यात यावा. विहीत नमुण्याव्यतिरिक्त वेगळया स्वरूपात प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. सदर आवेदन पत्रे दि. ३१ जुलै, २०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत खालील पत्त्यावर प्राप्त होतील या बेताने पाठविण्यात यावी. विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**वित्त व लेखा अधिकारी व सदस्य सचिव, शिक्षक कल्याण निधी समिती, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसर, अमरावती रोड, नागपूर – ४४० ०३३.**

**(डॉ. राजु हिवसे)**
वित्त व लेखा अधिकारी